सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६३ | गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com




व्यासपीठावर उपस्थित शिक्षणमंत्री ना. दादा भुसे, पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील व विष्णूभाऊ भंगाळे, आध्यात्मिक सेनेच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. प्रमिलागिरी गोसावी, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. सरिताताई माळी-कोल्हे, तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील, ज्येठ नेत्या अॅड. ललितताई पाटील, महिला आघाडीच्या शहरप्रमुख सौ. चित्रमाला महाजन, तालुकाप्रमुख सौ. सुरेखा पाटील, प्रा. डॉ. के. डी. पाटील, राजू शेख, डॉ. परिक्षित बाविस्कर आदी. (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# डॉ. परिक्षित बाविस्कर यांना मत म्हणजे ना. एकनाथराव शिंदेंना मत

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आवाहन; अपेक्षेप्रमाणे सभेत झाले व्यक्तिगत आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. परिक्षित बाविस्कर व शिवसेनेचे नगरसेवकपदासाठीचे उमेदवार यांच्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी म्हसकर प्लॉट येथे प्रचार सभा झाली. अपेक्षेप्रमाणे सभेत शहर विकास आघाडीचे उमेदवार जितेंद्र ठाकूर यांचे पूर्ण नाव न घेता त्यांच्यावर व्यक्तिगत आरोप झाले. तर आमदार अनिलदादा पाटील यांनाही पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी मिश्कील कोपरखळी मारली. या गरमागरमीत मुळातच आक्रमक असलेल्या माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या डोळ्यांतील अश्रूंनी सभेला एकदम भावनिक करून टाकले. खासदार डॉ. शिंदे यांनीही भाषणाला अहिराणीतून प्रारंभ करून उत्तम वातावरणनिर्मिती केली. त्यांनी उपस्थितांची चांगलीच वाहवा मिळविली. डॉ. बाविस्कर यांनीही ते स्थानिक असल्याचे सिद्ध करण्यासाठी अहिराणीचा वापर केला. सर्वच वक्त्यांनी लाडक्या बहिणींचे मनसोक्त कौतुक केले. खासदार डॉ. शिंदे यांचाच एकमात्र छोटेखानी सत्कार झाला. वेळेचे नियोजन करण्यासाठी हार-तुरे व सत्कारांना जाणीवपूर्वक टाळण्यात आले. दरम्यान, अमळनेरच्या राजकीय इतिहासात म्हसकर प्लॉटमध्ये झालेली ही पहिलीच राजकीय सभा होय. मैदान उमेदवार व त्यांचे समर्थक यांनी गच्च भरले होते. सर्वच उमेदवार उपस्थित होते. अनेकांनी



ढोल-ताशे व मोठ्या प्रमाणावरील समर्थकांसह येऊन शक्तिप्रदर्शन केले.

यावेळी शिक्षणमंत्री ना. दादा भुसे, जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील व विष्णूभाऊ भंगाळे, आध्यात्मिक सेनेच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा डॉ. प्रमिलागिरी गोसावी, तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील, महिला आघाडीच्या शहरप्रमुख सौ. चित्रमाला महाजन, तालुकाप्रमुख सौ. सुरेखा प्रवीण पाटील यांच्यासह शिवसेनेचे काही प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

ज्येष्ठ नेत्या अॅड. ललिताताई पाटील म्हणाल्या, की माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील हे सलग तीन टर्म धुळ्याहून अप-डाऊन करून आमदार राहिले, ते चालते. मात्र डॉ. परिक्षित बाविस्कर येथेच जन्मले, वाढले, शिक्षण घेतले. त्यांना वैद्यकीय व्यवसायासाठी जळगावला जावे लागले. तेथेही त्यांनी अमळनेरच्या अनेक कोरोना रुग्णांची अल्पदरात सेवा केली, हे चालते. असे असूनही त्यांना परगावचे म्हणणे हा दुटप्पीपणा आहे. अमळनेर पालिकेत सुलतानी करवसुली सुरू आहे, तरीही पालिकेला त्याबाबत राज्यस्तरीय बक्षीस दिले जाते. ' वसुंधरा माझी छान, शहरात सर्वत्र घाणच घाण ' असे चित्र असूनही येथील पालिकेला स्वच्छतेचेही राज्यस्तरीय बक्षीस मिळते, हे आश्चर्यच आहे. प्रकृती बिघडलेल्या पालिकेला आता डॉक्टरचीच गरज आहे.




मुस्लीम भगिनीकडून राखी बांधून घेताना , तर हिंदू भगिनीतर्फे औक्षण करवून घेताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे. शेजारी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

प्रा. डॉ. के. डी. पाटील, जिल्हा महिला आघाडी प्रमुख सौ. सरिताताई माळी-कोल्हे, माजी नगरसेवक गुलाब पाटील, राजू शेख यांचीही यावेळी भाषणे झाली. चंद्रकांत कंखरे यांनी सूत्रसंचालन केले. ▲



### मी अमळनेरचाच, मुळीच परका नाही...!

मी वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून व्यक्तिगतरित्या व विविध शिबिरांमधून मोठ्या प्रमाणावर जनसेवा केली आहे. मी येथेच जन्मलो, वाढलो व शिकलो आहे. माझा परिवार येथेच असतो. मला सर्व अमळनेर ओळखते. मी मुळीच परका नाही. पालिकेची तब्येत दुरुस्त करण्यासाठी माझ्यासारख्या डॉक्टरचीच गरज आहे. मी येथे काम करण्यासाठी आलो आहे. कुणालाही त्रास देण्यासाठी आलेलो नाही. जात-पात, धर्म याचा विचार न करता धनुष्यबाणाच्या चिन्हाचेच बटन दाबा.



### मला पोरके करू नका

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे सर्वांचे भाचे आहेत. मी अमळनेरचा भाचा आहे. मी नंदुरबारचा असलो, तरीही दुःखाच्या, संकटांच्या व अडचणीच्या प्रसंगी मीच धावून येतो. कोरोनाच्या काळात मी रेमडेसिव्हर पुरविण्यापासून ते रुग्णांना सर्वतोपरी मदत केली आहे. पालिकेवर आम्ही सत्तेत असताना नागरिकांना नियमित पाणीपुरवठा केला. माझ्या वडिलांचे निधन झाले आहे. मी पोरका झालो आहे. मला अमळनेरकर जनतेने कृपया पोरके करू नये. हारे का सहारा खाटू शाम हमारा. खाटू शामजींकडे तीन बाण आहेत. तर आमच्याकडे तीन उमेदवार आहेत आणि धनुष्यबाण आहे.



### पैसे दिले की अमळनेर फुटते हा भ्रम

' कोरोना 'काळात सर्वाधिक रुग्ण डॉ. परिक्षित बाविस्कर यांच्याकडे मीच पाठविले होते. त्यांनी रुग्ण देतील ते बिल स्वीकारले आहे. हल्ली सर्वत्र पार्ट्या सुरू आहेत. पार्ट्या खा. मात्र ' खा मटण, दाबा धनुष्यबाणाचे बटन ' हे विसरू नका. १ डिसेंबरला तुमच्या दारी येणारी लक्ष्मी जरूर स्वीकारा. मात्र शिवसेनेलाच विजयी करा. पैसे दिले की अमळनेर फुटते, हा काहींना भ्रम आहे. भाजीपाला निवडतानाही आपण चारदा विचार करतो. ही तर गावाची निवडणूक आहे. माजी आमदार शिरीषदादा चौधरी पहिलवान आहेत. त्यामुळे शिवसेनाही बलवान होईल.




### आम्ही पाणी देतो आणि पाजतो पण

डॉक्टर राजकारणातही शस्त्रक्रिया करतात. मी स्वतःच त्याचे उदाहरण आहे. त्यामुळेच अमळनेरसाठी डॉ. परिक्षित बाविस्कर योग्य उमेदवार आहेत. लोकांचा विश्वास उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे व शिवसेनेवर आहे. शिरीषदादा चौधरी दुःखातही मैदानात आहेत. वॉटर आणि गटर या पलीकडे जाऊन त्यांचे काम आहे. येथे साने गुरुजींचे स्मारक झाले पाहिजे. पाडळसरे धरण पूर्तीसाठीही आम्ही पाठपुरावा करू. शहराच्या पाणीपुरवठा समस्येबाबत ना. गुलाबराव पाटील लक्ष देतीलच. आम्ही लोकांना पाणी देतो आणि काहींना चांगलेच पाणी पाजतोही.

# विद्यार्थिनींच्या होणाऱ्या छेडखानीचा दै. ' ग्लोबल महातेज 'तर्फे ' एल्गार '

## जनआंदोलनासाठी आयोजन व नियोजनाची आज बैठक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील दै. ' ग्लोबल महातेज 'च्या माध्यमातून रोज वेगवेगळ्या समस्यांना वाचा फोडली जात आहे. त्यात एक निःस्वार्थ व निष्कलंक जागल्याची प्रामाणिक भूमिका निभावली जात आहे. हल्ली शहरात व तालुक्यातील सर्वांत ज्वलंत समस्या म्हणजे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींची समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या तरुणांकडून रोज छेडखानी होण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थिनींना जीवन नकोसे झाले आहे. काही विद्यार्थिनींनी तर आपले शिक्षणच बंद केले आहे. पोलिसांनी त्या अनुषंगाने काही कारवायाही केल्या आहेत. मात्र एवढ्याने हे गैरप्रकार थांबणार नाहीत. त्यासाठी दै. ' ग्लोबल महातेज 'च्या माध्यमातून जनआंदोलन उभारले जाणार आहे. या जनआंदोलनाच्या आयोजन व नियोजनाची गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी बैठक घेण्यात येणार आहे. शहरातील एस.टी. स्टॅन्डच्या पाठीमागील जी.एस. हायस्कूलच्या प्रांगणातील लायन्स क्लबच्या



आयएमए हॉलमध्ये दुपारी ३ वाजता ही बैठक होईल.

या बैठकीच्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शहरातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खासगी क्लास संचालक, वकील संघ, डॉक्टर्स, महिला मंडळ, सर्व सेवाभावी संस्था यांचे प्रतिनिधींनी कृपया वेळेवर अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन दै. 'ग्लोबल महातेज परिवारा'तर्फे करण्यात आले आहे. ▲

# गुटखा व्यावसायिकांवर ' मकोका ' लागणार ?

## ' एफडीए 'कडून गंभीरपणे विचार सुरू; कठोर पावले उचलण्याचा निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यासारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) करण्यात येणाऱ्या कारवाई अंतर्गत मागील सात महिन्यांत राज्यात सुमारे २२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा गुटखा आणि अन्य माल जप्त करण्यात आला आहे. गुटखा आणि अन्य माल जप्त करण्यात आला आहे. गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची चोरट्या पद्धतीने विक्री करणाऱ्यांवर ' मकोका ' कायद्यान्वये कारवाई करण्याबाबत ' एफडीए ' गांभीर्याने विचार करीत आहे.

> 
>
> “ राज्यात गुटखा व पान मसालाजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री होत आहे. त्याला जबाबदार असलेल्या व्यक्तीविरुद्ध ' मकोका ' अंतर्गत गुन्हा दाखल करता येऊ शकेल का? याबाबत विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठवून मार्गदर्शन घेण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे.
>
> – **नरहरी झिरवाळ,** अन्न व औषध प्रशासन मंत्री



गुटखा, पानमसाला, सुपारी, खर्रा, मावा या अन्नपदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही अनेक ठिकाणी त्याची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वारंवार कारवाई करण्यात येते. याच कारवाईचा भाग म्हणून गेल्या सात महिन्यांच्या कालावधीत ' एफडीए 'ने राज्यातील ३६५ दुकानांवर कारवाई केली. यामध्ये ३५४ दुकानांमध्ये तंबाखूजन्य प्रतिबंधित पदार्थ आढळले. या कारवाईत २२ कोटी १७ लाख ८९ हजार ९१४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यामुळे शालेय विद्यार्थी व तरुणांवर होणारे परिणाम लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. ▲

### ' मकोका 'अंतर्गत कारवाई विचाराधीन

राज्यात गुटखा विक्री आणि उत्पादनावर बंदी असली, तरी परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात गुटखा येतो. शाळा किंवा महाविद्यालयांजवळील टपऱ्यांवर सर्रास गुटखा विकला जातो. त्यावर जप्ती आणि विक्रेत्यांवर फौजदारी कारवाई केल्यानंतर पुन्हा काही दिवसांनी हे विक्रेते पुन्हा गुटखा विक्री सुरू करतात. गुटख्याच्या व्यसनामुळे शालेय विद्यार्थी व तरुण पिढी अनेक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जात आहे. त्यामुळे गुटखा विक्री करणाऱ्यांवर ' मकोको ' या कायद्यानुसार कारवाई करण्याचे सरकारच्या विचाराधीन आहे.



# ‘वीरू’ च्या निधनाने पूर्णपणे खचले अमिताभ बच्चन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तब्बल ५० वर्षांनंतर बॉलिवूडमधील प्रसिद्ध जय-वीरूची जोडी तुटली आहे. दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांचे सोमवारी निधन झाले. त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी सोशल मीडियावर अत्यंत भावूक पोस्ट लिहिली आहे. धर्मेंद्र यांच्या जाण्याने एक पोकळी निर्माण झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

जेव्हा जेव्हा धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन एकाच मंचावर दिसले, तेव्हा लोकांना ‘ जय-वीरू ’च्या जोडीची आवर्जून आठवण आली. हिंदी चित्रपटसृष्टीतील ही सर्वांत लोकप्रिय जोडी होती. १९७५ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘ शोले ’ या चित्रपटात ही जोडी पहिल्यांदा एकत्र दिसली. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनानंतर आता अमिताभ बच्चन एकटे पडले असले तरी ‘ जय-वीरू ’ या जोडीने चाहत्यांना ज्या खास आठवणी दिल्या, त्या आयुष्यभर लक्षात राहणाऱ्या आहेत. बॉलिवूडचे ‘ ही-मॅन ’ धर्मेंद्र यांचे सोमवारी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जिगरी दोस्त आणि छोटा भाऊ अमिताभ बच्चन हे त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी स्मशानभूमीवर पोहोचले होते. धर्मेंद्र यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर सोमवारी मध्यरात्री बिग बींनी सोशल मीडियावर भावूक पोस्ट लिहिली. अमिताभ बच्चन नेहमीच ट्विटर अकाऊंटद्वारे चाहत्यांच्या संपर्कात असतात. तेथे आपल्या भावना व्यक्त करत असतात. आता वीरूच्या आठवणीत त्यांनी लिहिले, की ‘ आणखी एक धाडसी आख्यायिका आपल्याला सोडून गेली आहे. एक असह्य शांतता मागे सोडून गेली आहे. धरमजी.. महानतेचे प्रतीक.. केवळ त्यांच्या प्रतिष्ठेसाठीच नाही तर त्यांच्या मनातील विशालता आणि अत्यंत प्रेमळ, साधेपणासाठी ते कायम लक्षात राहतील. पंजाबमधील गावाच्या




मातीतील सुगंध त्यांनी आपल्यासोबत आणला होता. त्या मातीशी ते कायम प्रामाणिक राहिले. ही इंडस्ट्री प्रत्येक दशकात बदलत होती, पण ते कधीच बदलले नव्हते. त्यात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यांचे हास्य, त्यांच्या स्वभावातील ऊब, त्यांचे आकर्षक सभोवतालच्या प्रत्येकापर्यंत पोहोचली. हे या इंडस्ट्रीत फार दुर्मिळ आहे. त्यांच्या जाण्याने आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली आहे.’

अमिताभ बच्चन यांनी धर्मेंद्र यांच्यासोबत अनेक चित्रपटांमध्ये काम केले होते. परंतु जय-वीरू या जोडीसाठीच दोघे खास ओळखले जातात. विशेष म्हणजे धर्मेंद्र यांचा शेवटचा चित्रपट येत्या २५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात त्यांनी अमिताभ यांचा नातू अगस्त्य नंदासोबत काम केले आहे.

अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र हे केवळ चित्रपटांमध्येच नाही तर एकाच मंचावर आणि एकाच फ्रेममध्ये अनेकदा एकत्र दिसले आहेत.

सोशल मीडियावर धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन यांचा एक जुना व्हिडिओसुद्धा व्हायरल होत आहे.

या व्हिडिओमध्ये धर्मेंद्र म्हणतात, “ अमिताभ माझ्या धाकट्या भावासारखा आहे. तो अजूनही काम करत असल्याचे पाहून मला खूप आनंद होतो. देव त्याला दीर्घायुष्य देवो.” हे ऐकून बिग बी भावूक होतात.

यावेळी मंचावर बिग बींसोबत त्यांची पत्नी जया बच्चन आणि धर्मेंद्र यांची पत्नी हेमा मालिनीसुद्धा उपस्थित होत्या.



# नौकरी छोड़कर शुरू किया व्यवसाय, केवल तीन साल में बनाया २८० करोड़ का कारोबार

**प्रेरणादायक**

हम छत्तीसगढ़ के भिलाई जैसे छोटे शहर से निकले एक ऐसे व्यक्ति की कहानी लेकर आए हैं, जिसने नौकरी छोड़कर अपने सपनों को हकीकत में बदला। राहुल सिंह ने जीवन का सबसे बड़ा जोखिम लिया और अपनी मेहनत और लगन से केवल तीन साल में २८० करोड़ रुपये का कारोबार खड़ा कर दिखाया। आइए, उनकी इस प्रेरणादायक यात्रा को जानें।

### नौकरी छोड़कर शुरू किया व्यवसाय

छत्तीसगढ़ के दुर्ग जिले के भिलाई निवासी राहुल सिंह ने स्थिर नौकरी को अलविदा कहकर अपना व्यवसाय शुरू करने का साहसी फैसला लिया। यह जोखिम उनकी सफलता का आधार बना। अपनी दूरदृष्टि और कड़ी मेहनत से उन्होंने अपने व्यवसाय को करोड़ों तक पहुंचाया।



### पर्यावरण-अनुकूल व्यवसाय की शुरुआत

साल २०२० में राहुल सिंह ने अपनी 4 करोड़ रुपये की बचत लगाकर अरविंद गणेशन के साथ मिलकर ‘ EcoSoul Home ’ कंपनी की स्थापना की। यह कंपनी बांस और ताड़ के पत्तों से पर्यावरण-अनुकूल उत्पाद बनाती है। इस अनोखी पहल ने उन्हें बाजार में अलग पहचान दिलाई।

### सरकारी स्कूल से अमेरिका तक का सफर

राहुल सिंह ने अपनी प्रारंभिक शिक्षा भिलाई के सरकारी स्कूल से पूरी की। इसके बाद उन्होंने सूरत के नेशनल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी से मैकेनिकल इंजीनियरिंग में बीटेक और फिर एमबीए किया। २००८ से २०१९ तक उन्होंने अमेरिका में नौकरी की। उनके सहयोगी अरविंद गणेशन को मार्केटिंग और सप्लाई चेन में १५ वर्षों से अधिक का अनुभव है।

### व्यवसाय का विस्तार

राहुल ने कर्नाटक के तुमकुर में ५,००० वर्ग फुट की मैन्युफैक्चरिंग यूनिट से शुरुआत की, जहां शुरू में २५ लोग काम करते थे। धीरे-धीरे उन्होंने अपने व्यवसाय का विस्तार किया। आज उनकी कंपनी ११ देशों में ३,८०० स्टोर्स तक अपने उत्पाद पहुंचाती है और १२० से अधिक लोगों को रोजगार दे रही है।

### तीन साल में २८० करोड़ का टर्नओवर

राहुल सिंह ने अपनी मेहनत और रणनीति से EcoSoul Home को केवल तीन साल में २८० करोड़ रुपये के टर्नओवर तक पहुंचाया। उनकी यह उपलब्धि न केवल प्रेरणादायक है, बल्कि यह भी दर्शाती है कि सही दृष्टिकोण और कठिन परिश्रम से असंभव को संभव बनाया जा सकता है। राहुल सिंह की कहानी हर उस व्यक्ति के लिए प्रेरणा है, जो अपने सपनों को सच करने की हिम्मत रखता है। नौकरी छोड़कर पर्यावरण-अनुकूल व्यवसाय शुरू करने का उनका फैसला और उसमें मिली अपार सफलता यह साबित करती है कि जोखिम लेने की हिम्मत और सही दिशा में मेहनत से बड़ा मुकाम हासिल किया जा सकता है।



# मांडी घालून जेवण्याचे फायदे वाचाल तर डायनिंग टेबल विसराल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पूर्वी आपले आजी-आजोबा मांडी घालून जमिनीवर बसून जेवायचे. मात्र आता डायनिंग टेबलने त्याची जागा घेतली आहे. मांडी घालून जेवण्याचे अनेक फायदे आहेत. जे तुमचे शरीर आणि मन दोन्ही निरोगी ठेवतात. चला, जाणून घेऊया या पारंपरिक पद्धतीचे खास फायदे.

### अन्नपचन सुधारते

मांडी घालून बसल्याने पोटावर हलका दबाव पडतो. ज्यामुळे पचनसंस्था अधिक कार्यक्षम होते. यामुळे अन्नपचन व्यवस्थित होऊन गॅस, अपचन यांसारख्या समस्या कमी होतात.

### रक्तप्रवाह सुरळीत होतो


ही बसण्याची पद्धत रक्तप्रवाह सुधारते. मांडी घालून बसल्याने शरीराच्या खालच्या भागात रक्तसंचार वाढतो. ज्यामुळे थकवा कमी होतो आणि शरीराला ऊर्जा मिळते.

### शरीराची स्थिती सुधारते

मांडी घालून बसल्याने पाठ आणि मान सरळ राहते. ज्यामुळे शरीराची पवित्रा (पोश्चर) सुधारतो. यामुळे पाठदुखी आणि मानदुखीसारख्या समस्या टाळता येतात.

### वजन नियंत्रणात राहते

या पद्धतीने बसल्याने तुम्ही हळूहळू जेवता, ज्यामुळे अतिरिक्त खाणे टाळले जाते. परिणामी, वजन नियंत्रणात राहते आणि पोट,



मांडी यांसारख्या भागांवरील चरबी कमी होते.

### मन शांत राहते

जमिनीवर बसून जेवण्याने मनाला शांती मिळते. ही पद्धत ध्यानासारखी आहे, जी तणाव कमी करते आणि जेवणाचा आनंद वाढवते.

# मेलेल्या मुंगीजवळ इतर मुंग्या का जमतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही कधी पाहिले आहे का, की जेव्हा एखादी मुंगी मरते तेव्हा इतर मुंग्या तिच्याभोवती जमतात. तिला दुसरीकडे नेतात? यामागचे कारण काय आहे, हे आपण जाणून घेऊया.

**मुंग्या : सामाजिक कीटक**

मानवांप्रमाणेच मुंग्या हे सामाजिक कीटक आहेत. त्या एकत्र राहतात, अन्न शोधतात आणि आपल्या वसाहतीचे रक्षण करतात. प्रत्येक काम त्या विशिष्ट व्यवस्थेनुसार आणि समन्वयाने करतात. पण मेलेल्या मुंगीजवळ त्या का जमतात, त्यांना सहकारी मुंगीचा मृत्यू कसा कळतो?

**मुंग्यांचा संवाद : फेरोमोनचा खेळ**

मुंग्या एकमेकांशी संवाद साधण्यासाठी फेरोमोन नावाचे रासायनिक सिग्नल वापरतात. जीवंत असताना त्या सतत फेरोमोन सोडतात. ज्यामुळे वसाहतीतील इतर मुंग्यांशी संपर्क साधला जातो. मात्र जेव्हा एखादी मुंगी मरते तेव्हा तिचे शरीर ओलेइक ॲसिड नावाचे रासायनिक सिग्नल उत्सर्जित करते. हे सिग्नल इतर मुंग्यांना मृत्यूची माहिती देते.

**मेलेली मुंगी आणि स्वच्छतेची जबाबदारी**

मुंग्या आपली वसाहत स्वच्छ ठेवण्यासाठी ओलेइक ॲसिडचा संदेश मिळताच मेलेल्या मुंगीभोवती जमतात. त्यानंतर त्या ‘ नक्रोफोरेसिस ’ नावाच्या प्रक्रियेद्वारे मेलेली मुंगी वसाहतीबाहेर काढतात. यामुळे वसाहत स्वच्छ राहते आणि रोगराई पसरण्याचा धोका टळतो. ही प्रक्रिया मुंग्यांच्या सामाजिक व्यवस्थेचा आणि शिस्तबद्धतेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. मुंग्यांचा हा व्यवहार केवळ त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत नाही, तर त्यांच्या वैज्ञानिक आणि व्यवस्थित जीवनशैलीचेही उदाहरण आहे. ओलेइक ॲसिडमुळे मेलेली मुंगी ओळखून तिला वसाहतीबाहेर काढणे, हे निसर्गातील एक आश्चर्यकारक तंत्र आहे.

# बिग बॉसच्या घराची रचना दरवर्षीच बदलते


## ते बांधण्यासाठी किती खर्च येतो? किंमत जाणून धक्का बसेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिग बॉस १९ सीझन आता चांगला चर्चेत आहे. स्पर्धकांचे वाद ते खेळातील ट्विस्ट यामुळे शो पाहणे प्रेक्षकांसाठी जास्तच रंजक आहे. एक गोष्ट नक्की आहे, की दरवर्षी बिग बॉसच्या घराची रचना बदलत असते. त्यांची थीम वेगवेगळी ठेवण्यात येते. मात्र तुम्हाला माहिती आहे का? बिग बॉसचे घर बनविण्यासाठी दरवेळेला किती खर्च येतो ?

### प्रत्येक सीझनमध्ये घर बांधणी

बिग बॉसच्या घरात प्रत्येक सीझनमध्ये हे घर बांधण्याचा खर्च जाहीर केला जात नाही. परंतु प्रत्येक सीझनमध्ये त्यासाठी मोठी रक्कम मोजली जाते. ज्याचा अंदाज कोट्यवधी रुपये आहे. मीडिया रिपोर्टस्नुसार बिग बॉसच्या घराच्या पाडण्याचा आणि पुनर्बांधणीचा खर्च जवळपास तीन ते साडेतीन कोटी रुपयांच्या दरम्यान आहे. हा खर्च केवळ बांधकामासाठी नव्हे, तर त्यात डिझाईन, सेटमधील बदल, सुरक्षा आणि शोसाठी आवश्यक असलेले सहाय्यक कर्मचारी यांचाही समावेश आहे. घर




बांधण्यासाठी अनेक कामगार सहा महिने काम करतात.

### घरात थीमनुसार बदल

घर बांधण्याचा खर्च दरवर्षी बदलतो. त्याचे कारण प्रत्येक हंगामात शोची थीम वेगळी असते. त्यानुसार त्याचे रूप बदलते. घराचे रूपांतर त्याच्यात थीमनुसार केले जाते. आर्ट डायरेक्टर्स आतील इंटेरियर्स डिझाईन करतात. ज्याच्या सुशोभीकरणासाठी खूप पैसे खर्च होतात.

### सतत देखरेखीसाठी अनेक कॅमेरे


घरात तंत्रज्ञान आणि सुरक्षितता ही एक मोठी समस्या आहे. सतत देखरेखीसाठी अनेक कॅमेरे बसविलेले असतात. ज्यामुळे कन्टेन्ट चालविण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. या घरासाठी मोठ्या प्रमाणात सहाय्यक कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. शेकडो कामगार बांधकामात सहभागी असतात. तर शो चालविण्यासाठी मोठ्या सहाय्यक कर्मचाऱ्यांचीही आवश्यकता असते.

### तब्बल एवढे कॅमेरे लावतात

लॉजिस्टिक्स आणि देखभालीसाठीही खूप खर्च येतो. ज्यामध्ये सेटची देखभाल आणि स्पर्धकांचे व्यवस्थापन यांचा समावेश असतो. एका वृत्तानुसार बिग बॉसच्या घरात बसविलेले कॅमेरे भाड्याने घेतले जातात. बिग बॉस संपल्यानंतर हे कॅमेरे सर्वांत आधी काढून टाकले जातात. सुमारे १२० कॅमेरे भाड्याने घेतलेले असतात. त्यांच्या किमती जास्त असल्याने ते काढून नीट ठेवले जातात. पुढील सीझनसाठी ते पुन्हा बसविले जातात.

### स्वयंपाक घरातील वस्तूंचे काय केले जाते?

स्वयंपाक घरातील वस्तू गुदामात पाठविल्या जातात. यामध्ये रेफ्रिजरेटर, ओव्हन, आरओ मशीन, गॅस्ट्रो आणि भांडी यांचा समावेश आहे. गुणवत्ता आणि स्वच्छतेच्या कारणास्तव या वस्तूंचा पुन्हा वापर केला जात नाही. सलमान खान ज्या टीव्हीवर स्पर्धकांशी संवाद साधतो तो टीव्ही देखील काढून गुदामात पाठविला जातो. बिग बॉसचे बेड प्रत्येक हंगामात बदलले जातात. स्पर्धकांचेही बेड प्रत्येक हंगामात बदलले जातात. कारागीर नवीन बेड बनविण्यासाठी सेटवर येतात. जुने बेड पुन्हा वापरले जात नाहीत. ते जास्त लक्झरी देत नाहीत. त्यामुळे बिग बॉसचे घरच नव्हे, तर घरातील वस्तू ते स्वयंपाक घरातील किराणा यापासून सारे काही नवे असते. त्यामुळे निश्चितच याचा खर्च हा कोट्यवधींमध्येच असतो आणि दरवर्षी तो बदलतो व वाढतोही.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# या निवडणुकांचे आता होणार तरी काय ?

## न्यायालयीन निर्णयावरच सर्व निवडणुकांचे भवितव्य अवलंबून

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आणखी तीन दिवस लांबणीवर पडली आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर आता शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सुनावणी होणारा आहे. तोपर्यंत कोणत्याही निवडणुकांची अधिसूचना काढण्यास राज्य निवडणूक आयोगाला मनाई करण्यात आली आहे. पुढील सुनावणीतही ओबीसी आरक्षणावर निर्णय झाला नाही तर जिल्हा परिषदा, महापालिका व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे भवितव्य टांगणीला लागण्याची शक्यता आहे.


नगरपालिका व नगर पंचायतींच्या निवडणुकांना स्थगिती देण्यास मात्र सरन्यायाधीशांनी नकार दिला. या प्रकरणाचा अंतिम निकाल लागल्यानंतर या निवडणुकांचे निकाल अवैध ठरले तर संबंधित जागांचे निकाल रद्द केले जाऊ शकतात, असे खंडपीठाने मंगळवारी झालेल्या सुनावणीमध्ये स्पष्ट केले. ओबीसी आरक्षणासंदर्भात अस्पष्टता राहिली तर हे प्रकरण व्यापक घटनापीठाकडे वर्ग केले जाईल, असेही सूर्य कांत यांनी स्पष्ट केले. अधिसूचना काढली असून निवडणुका स्थगित केल्या जाऊ शकत नाहीत, असा मुद्दा ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी मांडला होता. आरक्षण ५० टक्के असावे, की ६० टक्के यावर संघर्ष सुरू आहे. त्यावर न्यायालय आत्ताच टिप्पणी करू इच्छित नाही. पण गेल्या काही वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याने लोकांचे प्रतिनिधित्वच नाही. तसे होऊ नये म्हणून अधिसूचना जारी केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची परवानगी देत असल्याचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सांगितले.

# झालेल्या निवडणुकाही रद्द करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा इशारा

## ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेचे उल्लंघन नको

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्थानिक स्वराज्य संस्थांचा यापुढील निवडणूक कार्यक्रम जाहीर करताना ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेचे उल्लंघन व्हावयास नको, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाला सुनावले. निवडणूक जाहीर झालेल्या २८८ पैकी ५७ नगर पंचायती-नगर परिषदांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेली आहे. या ठिकाणची निवडणूक ही न्यायालयीन निकालाच्या अधीन असेल, असे सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. निवडणुका बेकायदा पद्धतीने घेण्यात आल्याचे निदर्शनास आले, तर त्या रद्द केल्या जातील, अशी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली. खटल्याची पुढील सुनावणी येत्या शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे.



### मोठ्या खंडपीठाकडे प्रकरण सोपवू

निवडणुका बेकायदा ठरविण्यात आल्या तर जनतेचा पैसा वाया जाईल. त्यामुळे त्याला आताच स्थगिती दिली जावी, असा मुद्दा काही पक्षकारांनी मांडला. ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जाऊ नये, असे ज्येष्ठ वकील नरेंद्र हुडा यांनी सुनावणीदरम्यान सांगितले. ‘ सध्या आम्ही गुणवत्तेवर जात नाही. पण गरज भासली तर मोठ्या खंडपीठाकडे हे प्रकरण सोपविले जाऊ शकते,’ असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सूचित केले. ज्या भागात ओबीसींची टक्केवारी ५० टक्क्यांवर गेली आहे, त्याची माहिती पुढील सुनावणीवेळी द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

# दीडशे ग्रॅमचा पक्षी करतोय रोज एक हजार कि.मी. प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



निसर्गाच्या अद्भूत दुनियेत ‘अमूर ससाणा’ नावाच्या चिमुकल्या पक्ष्याने शास्त्रज्ञांनाही चकित केले आहे. ‘अपपांग’ नावाच्या अवघ्या १५० ग्रॅम वजनाच्या पक्ष्याने दररोज सरासरी एक हजार किलोमीटर वेगाने प्रवास करून ७६ तासात तब्बल ३ हजार १०० किलोमीटरचे नॉनस्टॉप हवाई अंतर कापले आहे. वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या नेतृत्वाखालील ‘मणिपूर अमूर फाल्कन ट्रॅकिंग प्रोजेक्ट’ अंतर्गत ११ नोव्हेंबर २०२५ रोजी तीन ससाण्यांना उपग्रह ट्रॅकर लावण्यात आले. यामध्ये अपपांग (प्रौढ नर), अलंग (तरुण मादी) आणि अहू (प्रौढ मादी) यांचा समावेश होता. या ससाण्यांच्या प्रवासाची सुरुवात मणिपूरच्या घनदाट जंगलातून आणि शेतजमिनीतून झाली. अपपांगने स्थलांतरास सुरुवात केल्यानंतर अवघ्या ७६ तासात मध्य भारत, गुजरात ओलांडून अरबी समुद्राच्या किनाऱ्याकडे झेप घेतली. मध्य भारत, गुजरात ओलांडून तो अरबी समुद्राकडे निघाला. दररोज सरासरी १ हजार किलोमीटरचा वेग राखून, तो ग्रहावरील सर्वात वेगवान स्थलांतरित पक्ष्यांपैकी एक ठरला आहे. या अमूर ससाण्यांना भारतातून सोमालियापर्यंतचे नॉनस्टॉप ६ हजार किलोमीटरचे महासागरीय अंतर पार करायचे आहे. या ससाण्यांच्या प्रवासासाठी मणिपूर हे एक अत्यंत महत्त्वाचे थांबा केंद्र आहे. पूर्व आशियातून दक्षिण आफ्रिकेकडे स्थलांतर करताना हे पक्षी येथे हिवाळ्यात थांबतात.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# बारामतीत पुन्हा एकदा काका विरुद्ध पुतण्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बारामतीत विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार आणि त्यांचे पुतणे युवा नेते युगेंद्र पवार यांच्यात पहिल्यांदा लढत झाल्यानंतर आता बारामती नगर परिषदेच्या निडवणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा काका-पुतण्या समोरासमोर आले आहेत. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यानंतर त्यापैकी चार जमांना पैशाचे आमिष दाखविल्याचा आरोप युगेंद्र पवार यांनी केल्याने बारामतीतील राजकीय वातावरण तापले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन ‘ राष्ट्रवादी ’त वादाची ठिणगी पडणार असल्याचा अंदाज येताच महायुतीतील मित्रपक्ष भाजपने राष्ट्रीय समाज पक्षाच्या (रासप) साथीने उमेदवार उभे करून राजकीय खेळी खेळल्याचे स्पष्ट झाले आहे.

एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पहिल्यांदाच या नगर परिषदेची निवडणूक होत आहे. दोन्ही ‘ राष्ट्रवादी ’ने एकत्र निवडणूक लढवायची की स्वबळावर याबाबतचा निर्णय स्थानिक पदाधिकाऱ्यांनी घेण्याची भूमिका ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांनी स्पष्ट केली. त्यामुळे बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही ‘ राष्ट्रवादी ’ एकत्र येणार का, याकडे सर्वांचे लक्ष होते. मात्र स्वतंत्र निवडणूक लढण्याचा निर्णय घेण्यात आल्याने दोन्ही ‘ राष्ट्रवादी ’ एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पक्षाचे उमेदवार निवडताना उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांनी स्वतः लक्ष दिले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने युगेंद्र पवार यांच्याकडे नेतृत्व दिले आहे. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने युगेंद्र पवार हे पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. ना. श्री. अजितदादा पवार आणि युगेंद्र पवार या काका-पुतण्यामध्ये झालेल्या पहिल्या लढतीत ना. श्री. अजितदादा पवार यांनी बाजी मारली होती.

### अजितदादांच्या हाती २५ वर्षे कारभार

उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांच्या हाती गेली २५ वर्षे या नगर परिषदेचा कारभार आहे. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शरद पवार हे पालिकेच्या राजकारणात लक्ष घालत होते. त्यानंतर त्यांनी ना. श्री. अजितदादा पवार यांच्याकडे जबाबदारी सोपविली. तेव्हापासून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली या नगर परिषदेचा कारभार सुरू आहे. मागील निवडणुकीत तत्कालीन राष्ट्रवादी विरुद्ध अन्य पक्ष अशी लढत झाली होती. तेव्हा ३९ जागांपैकी ३५ जागा तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकत एकहाती सत्ता मिळविली होती.

# ‘ रामकृष्ण हरी ’ आणि अजितदादांची सावरासावरी..!

## अंबाजोगाईतील सभेत केले होते विधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : ना. श्री. अजितदादा पवार यांच्या सभा, त्यांनी केलेली वक्तव्ये आणि त्यामुळे जन्माला आलेले वाद हे आता तसे नवे नाहीत. मात्र चुकून काही वेळा काही शब्द निघून जातात आणि ना. श्री. अजितदादा पवार त्याचे खापर पुन्हा माध्यमांवर फोडतात. त्याचे झाले असे, की ना. श्री. अजितदादा पवार यांनी बीडमध्ये सभा घेतली आणि सहज बोलून गेले, ‘ रामकृष्ण हरी. ’ भर सभेत लोकांसमोर उभा राहिलेला एकमेव पर्याय होता ‘ वाजवा तुतारी. ’ खालून आवाज आला आणि मग पवार यांना कळले आपण काय बोलून बसलो. ‘ रामकृष्ण हरी, वाजवा तुतारी ’ हे घोषवाक्य विधानसभा निवडणुकीमध्ये चर्चेत आले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे चिन्ह तुतारी हे मराठवाड्यात तसे रुजलेले. लोकसभा निवडणुकीत बीडमध्ये तर ते अधिक खोलवर गेलेले. नेमके अंबाजोगाईत ना. श्री. अजितदादा पवार रामकृष्ण हरी म्हणाले आणि त्यांना पुन्हा पुढे सावरासावर करावी लागली.

नगरपालिका निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांची सोमवारी रात्री जाहीर सभा झाली. या सभेत बोलताना ना. श्री. अजितदादा पवार यांनी ‘ राम कृष्ण हरी ’ हा शब्द उच्चारला. यावेळी उपस्थितांपैकी काहींनी ‘ वाजवा तुतारी ’ असे म्हणत प्रतिसाददेखील दिला. त्यानंतर आयोजकांकडून एकाने पवार यांना एक चिठ्ठी लिहून देत या रामकृष्ण हरीचा वेगळा अर्थ निघू शकतो, असा निरोप दिला गेला. त्यानंतर पवारांनी सारवासारव करत आपण संतांच्या भूमीतील आहोत त्यामुळे एकमेकांना भेटलो तर राम कृष्ण हरी म्हणतो. तुमच्या मनातील शंका दूर करा. याचा कृपया वेगळा अर्थ लावू नका, असे स्पष्टीकरण दिले.

# थंडीतही राहा फिट! जाणून घ्या इम्युनिटी वाढविणारे खाद्यपदार्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

थंडी सुरू झाली, की शरीराला केवळ पांघरुणातूनच नाही, तर अन्नातूनही ऊब हवी असते. योग्य जीवनसत्त्वे आणि पोषक घटकांचे मिश्रण आपल्याला संपूर्ण हिवाळ्यात निरोगी आणि मजबूत राहण्यास मदत करते. तंतुमय पदार्थ (फायबर), खनिजे (मिनरल्स) आणि ‘बी’ जीवनसत्त्वाने परिपूर्ण असलेली बाजरीच्या भाकरीचा समावेश दिवसाच्या आरोग्यदायी सुरुवातीसाठी करा. बदाम आणि अक्रोड हे ओमेगा- ३, जस्त (झिंक) आणि जीवनसत्त्व ‘ई’ ने समृद्ध असतात. ते रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास, हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजांनी समृद्ध असलेला गूळ शरीराला उबदार ठेवतो. थंड महिन्यांमध्ये रोगप्रतिकारशक्तीला आधार देतो. संत्री, लिंबू आणि आवळा जीवनसत्त्व ‘सी’ ने भरलेले आहेत. याचा आहारा समावेश केल्याने रोगप्रतिकारक पेशींना संसर्गाशी लढण्यास मदत होते. मासे शरीराला आवश्यक पोषक तत्वे प्रदान करतात. थंडीतील कोरडेपणात त्वचेला सजल (हायड्रेटेड) ठेवण्यास मदत होते.

# दत्त जयंतीनिमित्त शिरूड येथे पारायण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील श्री मध्व दत्त संस्थानतर्फे बुधवार रोजी पारायणास सुरूवात झाली. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी पारायणाची सांगता होईल. बुधवारी सकाळी श्री सार विचार ग्रंथाचे नऊ दिवसांचे पारायण व नवकाळ पूजा होईल. सकाळी ८ ते ९ व दुपारी ३ ते ५ या वेळात शास्त्र वाचन होईल. रात्री ९ ते १० भजन होईल. रात्री १० ते ११ पूजापाठ होतील. गुरुवार, ४ डिसेंबर रोजी सांगतेनंतर महाप्रसाद वाटप होईल. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.




# डीपी रस्त्यामुळे शहराची कनेक्टिव्हिटी वाढणार

## विविध विकासकामांमुळे शहराच्या सौंदर्यात भर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहराच्या सौंदर्यात दिवसेंदिवस भर पडत असून विविध विकासकामांमुळे शहराची एक वेगळी ओळख निर्माण होत आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहराची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे. शहराचा विकास अविरत सुरू ठेवण्यासाठी अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन शहर विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या कार्यकाळात शहराने कात टाकली आहे. विविध विकासकामांची गंगाच जणू शहरात अवतरली आहे. ८० कोटी रुपयांच्या निधीतून तयार होत असलेला डिपी रोड, चोपडा तसेच नरडाणा रस्त्यावर झालेले प्रवेशद्वार,कॉलनी भागातील अंतर्गत रस्ते, शहराचे सौंदर्यीकरण यामुळे शहराच्या विकासात एक वेगळी भर पडलेली आहे.

**डीपी रस्त्यामुळे दळणवळणाला चालना**

अमळनेर शहरातून जात असलेल्या डीपी रस्त्यामुळे शहरातील अंतर्गत दळणवळण सोयीचे होईल. पारोळा रोड, गलवाडे रोड, धुळे रोड, चोपडा रोड जोडले जातील. यामुळे शहराच्या मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या संपणार आहे, सोबतच या डीपी रस्त्यामुळे शहराची हद्द वाढणार असून नागरिकांना पायाभूत सोयीसुविधा मिळणार आहेत.

ऐन पावसाळ्यात नागरी वस्तीत होणाऱ्या पूरपरिस्थितीला देखील या रस्त्यामुळे आळा बसणार आहे. ढेकू रस्ता व पिंपळे रस्त्याची समस्या यामुळे सुटणार आहे. हा डीपी रस्ता जणू संरक्षक भिंतीचे काम करणार आहे. दूरदृष्टी ठेवून डीपी रस्त्याची उभारणी आमदार अनिलदादा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

**प्रवेशद्वारांमुळे वेगळी ओळख**

अमळनेर शहरात प्रवेश करतांना चोपडा रस्त्यावर तसेच नरडाणा रस्त्यावर २ कोटींच्या निधीतून भव्य प्रवेशव्दार उभारण्यात आले आहे.तसेच पारोळा व धरणगाव रस्त्यावरील प्रवेशव्दाराला देखील मंजुरी मिळाली आहे. भविष्यात या भागात देखील भव्य प्रवेशव्दार उभारण्यात येणार आहेत.या प्रवेशद्वारांमुळे शहराला एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

शहरातील अनेक कॉलनी भागात भुयारी गटारीचे काम पूर्णत्वास आले आहे. अनेक भागातील रस्ते पूर्ण झाले आहे. काही भागांमध्ये कामे सुरू आहेत. कॉलनी भागातील रस्त्यांचा विकास झाल्यामुळे नागरिकांच्या समस्या सुटल्या आहेत.ज्या भागात रस्ते राहिले आहेत त्या भागात देखील भविष्यात अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीच्या माध्यमातून पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

**शहराचे आधुनिक सौंदर्यीकरण**

अमळनेर शहराच्या सौंदर्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. हा विकास असाच पुढे सुरू राहणार आहे. मुख्य रस्त्यावरील रात्रीची रोषणाई, कॉलनी भागातील रंगीबेरंगी पथदिवे शहराच्या सौंदर्यात भर टाकत आहेत. भविष्यात शहरातील प्रत्येक भागात वैशिष्टयपूर्ण योजनेतून पथदिवे बसविण्यात येणार असून, खुल्या भूखंडांचा विकास केला जाणार आहे. या माध्यमातून लहान मुलांसाठी खेळाची मैदाने, वयोवृद्धांसाठी नाना -नानी पार्क, तरुणांसाठी जॉगिंग ट्रॅक, महिलांसाठी विशेष सोयी-सुविधा उभारण्यात येणार आहेत.

शहराचा हा विकास असाच सुरू ठेवायचा असेल तर अमळनेर तालुका शहर विकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र ठाकूर तसेच १८ प्रभागांतील सर्व ३५ नगरसेवकांच्या नावासमोरील शिट्टी चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना विजयी करण्याचे आवाहन अमळनेर तालुका शहर विकास आघाडीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.




# राम मंदिराच्या ध्वजावर कोविदार वृक्ष, सूर्य, ॐ ही चिन्हे का?

राम मंदिराच्या ध्वजावर (धर्म ध्वजावर) कोविदार वृक्षाचे निशाण असण्यामागे मोठे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व आहे. त्याचे मुख्य कारण खालीलप्रमाणे आहेत.

**अयोध्यानगरीचे प्राचीन राजचिन्ह :** कोविदार वृक्ष हे प्राचीन अयोध्यानगरीचे राजचिन्ह मानले जात होते. रघुवंशाचे (सूर्यवंशी) राजा, ज्यांच्या वंशातील भगवान राम होते, त्यांच्या ध्वजावर हे चिन्ह परंपरेने कोरले जायचे.

**रामायणातील संदर्भ :** वाल्मिकी रामायणातील एका संदर्भानुसार जेव्हा भरत चित्रकूट येथे प्रभू श्रीरामचंद्रांना भेटण्यासाठी आपल्या सेनेसह आले होते, तेव्हा लक्ष्मण यांनी दूरून येणारी ती सेना कोविदार वृक्षाच्या चिन्हामुळे अयोध्येची आहे हे ओळखले होते. हे चिन्ह राजसत्तेचे आणि शौर्याचे प्रतीक मानले जात होते.

**शुभ आणि पवित्रता :** कोविदार वृक्षाला अयोध्याच्या प्राचीन ओळखीशी आणि पवित्रतेशी जोडले जाते. ते स्थायित्व, धर्मनिष्ठा आणि जीवनाच्या निरंतरतेचे प्रतीक आहे.

**राम राज्याचे प्रतीक :** कलियुगात पुन्हा अयोध्येत उभारलेल्या राम मंदिरावर फडकवलेला हा ध्वज राम राज्याच्या संकल्पांची आठवण करून देणारा आहे.




## राम मंदिराच्या या धर्म ध्वजावर तीन प्रमुख प्रतीके आहेत:

**सूर्य :** भगवान प्रभू श्रीरामचंद्रांच्या सूर्यवंशाचे प्रतीक.
**ॐ :** सनातन धर्माचे आणि अखंड आध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीक.
**कोविदार वृक्ष :** अयोध्येच्या प्राचीन राजपरंपरेचे आणि राजसत्तेचे प्रतीक.
हे तिन्ही प्रतीक एकत्र येऊन भारताच्या संस्कृतीचा, अध्यात्माचा आणि गौरवाचा संदेश देतात.

## असा आहे ध्वज

अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरावर मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी ध्वज फडकविण्यात आला. भगव्या रंगाचा २२ फूट लांब व ११ फूट रुंद ध्वज मंदिराच्या १६१ फूट उंच कळसावर विराजमान झाला. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभ हस्ते मंदिरावर बसविण्यात आलेला ध्वजदंड ४२ फूट उंच आहे. सूर्य, ‘ ओम ’ हे शुभचिन्ह आणि कोविदार वृक्ष या ध्वजावर आहेत. कोविदार वृक्षाचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आढळतो. पौराणिक मान्यतांनुसार हा पारिजात व मंदार या वृक्षांच्या दिव्य संयोगातून बनलेला वृक्ष आहे. आजच्या काळातील कचनार वृक्ष हा कोविदार वृक्षासारखा दिसतो. सूर्यवंशी राजांच्या ध्वजावर या वृक्षाची प्रतिमा होती. महर्षी वाल्मिकी यांनी लिहिलेल्या रामायणानुसार भरत राजाच्या ध्वजावर कोविदार वृक्षाची प्रतिमा होती.




# ‘ श्री स्वामी समर्थ ’चा नेमका अर्थ काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

षडाक्षरी स्वामी नाम ‘ श्री स्वामी समर्थ ’ हे महाराजांचे नाव नाही, तर ब्रह्माण्डगस्तीय अद्वैत प्रकृती पुरुषात्मक तारक बीज मंत्र आहे. ॐ नमः शिवाय, दूं दूर्गायै नमः, श्री गुरुचरित्र हे ज्याप्रकारे षडाक्षरी तारक मंत्र आहेत त्याचप्रमाणे समानार्थी ‘ श्री स्वामी समर्थ ’ हा सुद्धा सद्गुरू अनुग्रहीत तारक मंत्र आहे. या तारक मंत्राद्वारे आपण आपल्या श्वास श्वसनावर अजपाजप संधान केल्यास महाराजांचे अंतरीक आत्मज्ञान चित्त शुद्धीकरण योगातून सहजच होते. असा अनेकांचा अनुभव आहे. या तारक मंत्राचा मतितार्थ व्यवस्थित समजून घेऊन त्या योगे आत्माचरण करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित आत्मप्रत्यययोग सर्वसाधारण वेळेपेक्षा अधिक लवकर व आधिक प्रभावकारक होत असतो. श्री स्वामीं समर्थ या सद्गुरू ब्रह्मवाचक षडाक्षरी तारक बीजमंत्राचा मतितार्थ खालीलप्रमाणे आहे.

श्री स्वयं श्रीपदाविराजीत सद्गुरू भगवान दत्तात्रय स्वामी महाराज.
स्वामी - स्वाः + मी
स्वाः म्हणजे भस्म करणे अथवा आत्मसमर्पित करणे असा आहे.
मी म्हणजे माझे अज्ञान, अहं भाव, रिपु गण व ईच्छ्या...! अर्थात स्वामी म्हणजे माझा मी पणा स्वाः करा.
समर्थ
समर्थ म्हणजे संसाररूपी भवसागर. सहज तारून नेण्यासाठी माझे स्वयंभू शिवत्व जागृत करा...! त्यायोगे श्री स्वामी समर्थ म्हणजे श्रीपदविराजित भगवान दत्तात्रय स्वामी महाराज माझे मीपण भस्म करून स्वयंभू शिव तत्त्व सद्गुरूकृपे अंकित करणे होय.




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मला समज नव्हती तेव्हापासून माझे दोन्ही आजोबा, काका, मामा एकमेकांना रामराम घालायचे. इंडियन आर्मीमध्ये सर्वजण सीनिअरला रामराम साहबजी म्हणतात. खूपदा हा शब्द ऐकला होता. मात्र अर्थ समजला नव्हता. माझे सासरे एकमेव व्यक्ती होते ज्यांनी मला कायम राम राम म्हणून स्वागत केले. त्यांना प्रतिक्रिया म्हणून मी सुद्धा राम राम करत राहिलो. मात्र अर्थ समजला नाही.

एके दिवशी रामरक्षा स्तोत्र का म्हणावे? बिकट स्थिती असताना आवर्जून का म्हणावे? याबाबत एक मेसेज वाचत असताना अर्थ समजलाय. रामरक्षा स्तोत्र म्हणतात इतक्या वेळेस राम शब्द का येतो?

१) ‘ र ’ अक्षराचा उच्चार करताना आपल्या नाभी म्हणजे बेंबीजवळील भाग आतमध्ये ओढला जातो. तो आत जातो तेव्हा आपले मणिपूर चक्र कार्यान्वित होते. हे चक्र नाभिस्थानाजवळ असते. याला दहा पाकळ्या असून सत्वगुणात्मक सृष्टीचे पालन करणारा विष्णू याची अधिष्ठात्री देवता आहे.
२) शरीराचा मध्यबिंदू अर्थात गुरुत्वमध्य याच चक्रात असतो.
३) या चक्रावर धारणा केल्याने चित्तात सत्वगुण वाढून ते स्थिर होऊ लागते.
४) धारणा म्हणजे काय? चित्ताची स्थिरता म्हणजे धारणा किंवा एकाग्रता.
५) चित्त शरीरातील एखाद्या भागावर स्थिर ठेवण्याचा अभ्यास करणे म्हणजे धारणेचा अभ्यास करणे होय.
६) महत्त्वाचे म्हणजे एकदा आपल्याला आपल्या चक्रांचे शरीरातील स्थान माहीत झाले, की त्या स्थानावर धारणा केली (त्या स्थानावर आपले चित्त एकाग्र केले) की त्या चक्रावर ती धारणा केली, असे म्हणतात.
७) ज्या नाडीचक्रावर आपण चित्त स्थिर केले (धारणा केली) की त्या चक्रांतील नाड्यांचे आणि त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या इंद्रियांचे व्यापार सुसूत्रपणे चालू लागतात.

उदाहरणार्थ- आपल्या शरीरातील खालील अवयव/ग्रंथी मणिपूर चक्राच्या नियंत्रणाखाली असतात.
मला याचे अजिबात ज्ञान नव्हते...
- लिव्हर
- पॅन्क्रिस
- स्मॉल इन्टेस्टाईन
- किडनी
- अ‍ॅड्रेनल ग्लॅण्ड
- गाल ब्लॅडर

मणिपूर चक्र बिघडले की हे रोग होऊ शकतात.
- इन्डिजेशन
- डायबिटीस
- अ‍ॅसिडिटी
- अल्सर
- चोलिटीस
- अपेंडीसीटीज
- किडनी स्टोन
- नेफ्रोपॅथी

वर उल्लेख केला आहे अ‍ॅड्रेनल ग्लॅण्डस्‌चा आणि त्याला बोल्ड केले आहे. या ग्लॅण्डस्‌ खूप महत्त्वाचे हॉर्मोन्स निर्माण करतात त्यांचे नाव आहे-
अ‍ॅड्रेनालाईन आणि कॉर्टिसोल
अ‍ॅड्रेनालाईनची लेव्हल बिघडले की खालील परिणाम होतात-
हाय बी.पी.
हाय शुगर
डिप्रेशन

एखादी वाईट बातमी आली की आपले हृदयाचे ठोके वाढतात, बी.पी. वाढते, भीती वाटते, एक्झिस्टमेंट वाढते, अ‍ॅन्झायटी वाढते.
ते कशामुळे? तर त्यावेळी आपल्या अ‍ॅड्रेनल ग्लॅण्डस्‌ खूप उत्तेजित होतात म्हणून यालाच आपण म्हणतो पोटात खड्डा पडला किंवा छातीत धस्स झाले. हा आघात आपल्या मणिपूर चक्रावर होतो, हृदयावर नाही. पण त्याचे परिणाम हृदयावर होतात.
मग ते प्रेझर रिलीज करायला लगेचच आपल्या सिस्टीम्स अ‍ॅक्टिव्हेट होतात. काही लोकांना लगेच युरीन पास होते, काही लोकांना तर लगेच शौचास जावे लागते. असे होते म्हणजे समजावे की आपल्या सिस्टीम व्यवस्थित काम करत आहेत. अशा परिस्थितीत बरेच जुने लोके रामरक्षा म्हणायला सुरूवात करतात.
खर आहे ना?

**रामरक्षाच का?**

मणिपूर चक्राचे बीज अक्षर आहे ‘ र ’. ‘ र ’ चा वारंवार उच्चार केल्याने आपले मणिपूरचक्र आहत होते आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या सर्व इंद्रिये / ग्रंथी उत्तेजीत होतात. सोप्या भाषेत सांगायचे तर चार्ज होतात व त्यातून निघणारा स्त्राव नियंत्रित होतो. परंतु नुसते एकसारखे रं म्हणत राहिलो की कंटाळायला होईल. आपल्या बुधकौशिक ऋषींना याचे पक्क ज्ञान होते म्हणून त्यांनी रामरक्षा स्तोत्राची रचना केली.
रामरक्षेत किती वेळा ‘ र ’ अक्षर येते ? ते मोजून पाहा. त्याची आवर्तने केलीत तर किती वेळा ‘ र ’चा उच्चार होईल याची कल्पना करा. मग किती वेळा आपले मणिपूरचक्र आहत होईल याचा विचार करा. कुठल्याही चक्राला अ‍ॅक्टिव्ह करायचे असेल तर त्याच्यावर धारणा करायची असते.
आपण रामरक्षा म्हणताना डोळे मिटून मणिपूरचक्रावर आपले चित्त एकाग्र केले तर निश्चितच आपले चक्र अ‍ॅक्टिव्हेट होईल आणि सतत ‘ र ’ अक्षराच्या उच्चाराने निर्माण होणारी एनर्जी, त्या चक्रांतील नाड्यांचे आणि त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या इंद्रियांचे शुद्धीकरण व बळकटीकरण करेल. परिणामी त्याला संलग्न असलेले आजार पण मिटतील. म्हणून जुने लोक म्हणजे आपलेच पूर्वज कुणी वारल्यानंतर त्याच्या अंत्ययात्रेला नेताना राम बोलो भाई राम म्हणायचे... का तर मनावरचा दबाव हलका व्हावा. आपले आणि समोरच्याचे आरोग्य राखण्यासाठी पुन्हा पुन्हा राम राम, ‘ र ’ ‘ र ’... राम राम या अक्षरांच्या उच्चाराने एकमेकांना रामराम घालायचे.

# वांगी, कांदा, लसूणप्रेमींनो आजपासून व्हा सुरू...!



## येळकोट, येळकोट जय मल्हार; खंडोबाची उचलली गेली तळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या सहाव्या दिवशी येणाऱ्या तिथीला चंपाषष्ठी असे म्हणतात. या दिवशी खंडोबाचा नवरात्र उत्सव संपतो. या दिवशी खंडोबाने मणी-मल्ल या दैत्यांचा वध करून लोकांना संकटमुक्त केले होते. यावेळी ‘ तळी उचलणे ’ हा पारंपरिक विधी करतात. या दिवशी खंडोबाचा प्रसाद म्हणून वांग्याचे भरीत आणि भाकरी दिली जाते. पावटा, वाल, तुरीच्या शेंगा, गाजर आणि कांदापात या हिवाळी भाज्या खाणे सुरू करता येते. या संपूर्ण परंपरेला धार्मिक महत्त्व आहेच, पण याचा सखोल संदर्भ विज्ञानाशी आहे.

### सात्त्विकता जपणे

चातुमार्सात भगवान विष्णू योगनिद्रेत असतात. त्यामुळे साधकांनी आहार-विहारात जास्तीत जास्त सात्त्विकता ठेवून इंद्रिय संयम साधावा, असा शास्त्रीय दृष्टिकोन आहे. कांदा, लसूण तामसिक-राजसिक मानले जातात. आयुर्वेद आणि काही धर्मग्रंथांनुसार कांदा, लसूण हे काम, क्रोध, भावना, जडत्व वाढविणारे पदार्थ आहेत. त्यामुळे पूजा-ध्यानात मन विचलित होऊ नये, म्हणून त्यांना वर्ज्य केले जाते.

### वैज्ञानिक कारणे


- चातुर्मास म्हणजे साधारणपणे पावसाळा : जुलै ते ऑक्टोबर हा कालावधी आहे. या काळात बॅक्टेरियल संसर्ग जास्त होतो. या काळात पचनशक्ती कमी होते. कांदा, लसूण जड, तीक्ष्ण व गॅस-आम्लता वाढविणारे आहेत. त्यामुळे काही संवेदनशील लोकांना त्रास वाढतो. म्हणून चार महिने त्यांचा त्याग केला जातो. याचा भविष्यात फायदा होतो.
- किडी-बुरशीची वाढ : पावसात साठवलेल्या भाज्यांवर बुरशी वाढण्याचा धोका जास्त असतो. विशेषतः वांगी हिरव्या देठाजवळून लवकर खराब होतात. त्यातून पोटाच्या तक्रारी वाढू शकतात.
- दाह व शरीरातील उष्णता वाढते : लसणू, कांदा हे औषधी असूनही उष्णता वाढविणारे अन्न आहे. या मोसमात शरीर नैसर्गिकरीत्या शीतल राहणे आवश्यक आहे.
- धार्मिक दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन : चातुर्मास शरीर-मन शुद्धीकरणाचा काळ आहे. सात्त्विक, पचायला सोपा आहार घ्यावा, म्हणून कांदा, लसूण, वांगी खाणे बंद करतात.

### साथ देण्याचे वचन देणारी ‘ तळी ’ उचला

- तळी उचलणे म्हणजे एकमेकांना साथ देण्याचे वचन देणे.
- एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचे वचन देणे.
- या प्रथेमुळे वधू आणि वरांमधील प्रेम व आपुलकी वाढते.
- तळी उचलण्याची प्रथा ही वैवाहिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. या प्रथेमुळे वधू आणि वरांना एकमेकांबद्दल आदर आणि प्रेम व्यक्त करण्याची संधी मिळते.

### उत्तर भारतात कटाक्षाने पाळतात परंपरा

जैन समाज आणि वैष्णव पंथ, जैन धर्मात कांदा, लसूण कंदमूळ जमिनीखालची कोणतीही भाजी खात नाहीत. त्याचा प्रभाव वैष्णव घरांवरही पडला. चातुर्मासात व्रत, उपवास करण्याची परंपरा तीव्र असल्याने हे अधिक काटेकोर पाळले जाते.



## तळी भरतेवेळी म्हणावी ही आरती

**बोल खंडेराव महाराज की जय।**
**सदानंदाचा येळकोट ।**
**येळकोट येळकोट**
**जय मल्हार।**
**हर हर महादेव।**
**चिंतामण मोरया।।**
**भैरोबाचा चांदोबा ।**
**अगडबंब नगारा।।**
**सोन्याची जेजुरी।।**
**मोत्याचा तुरा।।**
**निळा घोडा ।। पाई तोडा ।**
**कमरी करगोटा ।। बेंबी हिरा ।**
**गळ्यात कंठी।। मोहन माळा ।**
**अंगावर शाल।। सदा हिलाल।।**
**जेजुरी जाई।। शिकार खेळी।**
**म्हाळसा सुंदरी । आरती करी।।**
**देवा ओवाळी ।। नाना परी।**
**देवाचा श्रृंगार । कोठ लागो शिखरा।।**
**खंडेरायाचा खंडका ।**
**भंडाऱ्याचा भडका।।**
**बोल सदानंदाचा येळकोट ।**
**येळकोट येळकोट जय मल्हार।।**

# आध्यात्मिक मार्गात अडथळे का येतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल अनेक जण म्हणताना दिसतात, की देवाची उपासना सुरू केली आणि उलट त्रास वाढले. त्यामुळे आता फारसा देव-धर्म करत नाही. हे वाक्य अनेकदा आपण ऐकतो. मात्र यामागील खरे कारण फार कमी लोकांना माहीत असते.

माणूस साधारणपणे अडचणींमध्ये, संकटांमध्ये असताना देवाची आठवण काढतो. तेव्हा तो जप, ध्यान, व्रत, सेवा सुरू करतो. पण आश्चर्य म्हणजे याचवेळी त्याच्या आयुष्यात काही विचित्र घटना घडायला लागतात. घरात वाद-विवाद होतात, गैरसमज वाढतात, शरीर अस्वस्थ होते, कामांमध्ये अडथळे येतात, व्यवसायात अडचणी वाढतात आणि मग माणूस गोंधळतो, निराश होतो आणि उपासना थांबवतो. येथेच आपण चुकतो.

खरेतर उपासना सुरू होताच आपल्या आत वर्षानुवर्षे साठलेली नकारात्मक ऊर्जा अस्वस्थ व्हायला लागते. ही नकारात्मक शक्ती आपल्याला इतक्या सहज सोडून जात नाही. कारण ती आपल्या मनावर, शरीरावर आणि कर्मांवर आपली पकड घट्ट बसवून ठेवते. आध्यात्मिक साधना, मंत्रस्मरण, जप-तप यामध्ये इतकी ताकद असते की ही नकारात्मक शक्ती हळूहळू वितळायला लागते, बाहेर पडायला लागते. पण ती सहजपणे जात नाही; ती प्रतिकार करते, त्रास देते. याच काळात आपण अधिक सावध, धैर्यशील राहिले पाहिजे.

जेव्हा आपण हार न मानता उपासना चालू ठेवतो, तेव्हा हे अंधाराचे थर गळून पडतात. मग आयुष्यात नवीन प्रकाश येतो, इच्छा पूर्ण व्हायला लागतात, पूर्वकर्मांचा निचरा होतो, पुण्यसंचय सुरू होतो आणि हेच पुण्य संकटाच्या काळात आपली ढाल बनते. त्यामुळे संकटे आली, अडचणी वाढल्या तरी उपासना सोडू नका. कारण तीच खरी परीक्षा असते. म्हणून श्री दत्तात्रय महाराज म्हणतात, की एकदा माझ्या छायेखाली आलो की भीती नाही. आध्यात्मिक मार्ग हा काटेरी असतो, पण त्याच्यातून चाललात तर शेवटी फुलांचा सडा मिळतो.